दिनांक १०/०८/२०२१

# प्रसिध्दी पत्रक

**१) आलोसे श्री. अनिल विष्णु सावंत, पद- भुमापक, उपअधिक्षक भुमीअभिलेख कार्यालय पैठण, ता.पैठण, जि.औरंगाबाद, २) खाजगी आरोपी श्री.सचिन विष्णु सावंत, व्यवसाय- खाजगी ठेकेदार यांनी तक्रारदार यांच्याकडे १,००,०००/- रु लाचेची मागणी करुन तडजोडअंती ९०,०००/- लाचेची रक्कम स्विकृती केल्याने, ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे सातारा, औरंगाबाद शहर येथे गुरनं ३९१/२०२१ कलम ७, ७(अ) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आलोसे यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | **१)आलोसे श्री.अनिल विष्णु सावंत,पद-भुमापक,उपअधिक्षक भुमीअभिलेख कार्यालय पैठण, ता.पैठण, जि.औरंगाबाद,रा**<br>**२)खाजगी आरोपी श्री.सचिन विष्णु सावंत,वय २४ वर्ष व्यवसाय- खाजगी ठेकेदार** |
| लाच मागणी रक्कम | :- | ९०,०००/- रुपये |
| तपास अधिकारी | :- | श्री. गणेश धोक्रट,पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे पक्षकारांचे कृषक जमीनीचे अकृषक जमीनीत रुपांतर करण्यासाठी, जागेचा रेखांकन नकाशा बरोबर आहे की नाही असे बघुन डिमार्केशन नकाशा तयार करुन देण्यासाठी |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार हे स्थापत्य अभियंत्रिकी सल्लागार असुन त्यांचेकडे असलेल्या पक्षकार यांचे कृषक जमिनीचे अकृषक जमिनीत रुपांतर करण्यासाठी, जागेचा रेखांकन नकाशा बरोबर आहे की नाही असे बघुन डिमार्केशन नकाशा तयार करुन देण्याचे काम श्री अनिल सावंत, भुमापक पैठण यांच्याकडे होते. तक्रारदार यांच्याकडुन पक्षकाराचे काम करण्यासाठी सदर कामाचे ६०,०००/- रुपये आधीच श्री. अनिल सावंत,भुमापक पैठण यांनी घेतलेले असुन ते आणखीण १,००,०००/- रुपये लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, **श्री अनिल सावंत, भुमापक पैठण** यांनी या अगोदर ६०,०००/- रुपये घेतल्याचे मान्य करुन १,००,०००/- रुपये लाचेची मागणी केली. तडजोडअंती ९०,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले आहे.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे दिनांक ०९/०८/२०२१ रोजी सापळा आयोजीत केला असता, आलोसे १) श्री. अनिल विष्णु सावंत, भुमापक, उपअधिक्षक भुमीअभिलेख कार्यालय पैठण, ता.पैठण, जि.औरंगाबाद यांच्या वतीने २) खाजगी आरोपी श्री सचिन विष्णु सावंत, धंदा- खाजगी ठेकेदार यांनी तक्रारदार यांच्याकडुन ९०,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन सातारा, औरंगाबाद शहर येथे गु.र.नं.३९१/२०२१ कलम ७,७(अ) भ्र.प्र.अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, प्रभारी अपर पोलीस अधीक्षक मा. बी.व्ही.गावडे, पोलीस उप अधिक्षक मा. रुपचंद वाघमारे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. गणेश धोक्रट यांनी कारवाई केली आहे. त्यांना सदरच्या कारवाई कामी पोना- सुनिल पाटील, दिगंबर पाठक, पो.अं.विलास चव्हाण, चालक पोलीस अमंलदार चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना अवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.**

**संपर्क पत्ता** :- **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद**
**ई- मेल** :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
**ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन** :- **acbmaharashtra.net**
**संपर्क क्रं.** :- **०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४,**
**पोलीस अधीक्षक** :- **८८८८८०७२९९**
**अपर पोलीस अधीक्षक** :- **९६३७०६१४७८**
**पोलीस उप अधीक्षक** :- **९९७००२२२५७**

**(रुपचंद वाघमारे)**
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद.